।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे




**देवी महागौरी**

नवरात्रोत्सवाच्या आठव्या दिवशी पूजली जाणारी माता दुर्गाची आठवी शक्ती आहे.


अहिल्यानगर ■ रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १०३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145 ■ www.veerbhuminews.com


## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### लक्ष

किती झाले नुकसान
किती देता भरपाई
काय चाललंय कळेना
कुठे उरली लोकशाही
बोटावरची शाईआधी
नेते बदलतात पक्ष
दर पाच वर्षांनी पुन्हा
आमच्यावर ठेवा लक्ष

## SPOT NEWS

### 'नीट',एमपीएससी नंतर आता 'सेट' परीक्षेतही गोंधळ

● **पुणे** – महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा अर्थात 'सेट' परीक्षेचाही पेपर 'सेट' करण्याचा प्रकार सुरू असल्याची गंभीर बाब माहिती समोर आल्यानंतरही सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठ प्रशासन ठोस कारवाई करण्यास धजावत नाही. याचा अर्थ संबंधित प्राध्यापक कुणाच्या इशाऱ्यावरून का? करत आहे का? त्याचा 'आका' कुणी आहे का? तात्काळ चौकशी समिती स्थापन करून सेट परीक्षेचा पेपर सेट करू पाहणाऱ्यावर विद्यापीठ प्रशासन कारवाई का? करत नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महाराष्ट्र आणि गोव्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक पदासाठी सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. सदर परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतली जाते. देशात आणि राज्यात मागील काही महिन्यांपासून पेपरफुटीचा प्रश्न ऐरणीवर आलेला असतानाच सेट परीक्षेचा पेपरही सेट करण्याचा प्रयत्न झाल्याची बाब उघड झाली आहे.

### पुण्यात डेंग्यूचा उद्रेक वाढला

● **पुणे** – शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव कायम असून, जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत १,६४३ रुग्णांची नोंद झाल्याची माहिती उपलब्ध आकडेवारीतून समोर आली आहे. सप्टेंबरमध्ये सर्वाधिक ६६२ रुग्ण आढळल्याने महापालिकेने वॉर्डनिहाय चार अधिका–यांना कारणे दाखवा नोटीस बजावून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर खासगी रुग्णालयांतही रुग्णसंख्या वाढत असल्याने नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, जूनमध्ये १०३, जुलैमध्ये ३६६, ऑगस्टमध्ये ५१२, तर सप्टेंबरमध्ये ६६२ रुग्णांची नोंद झाली. दरम्यान, डासोत्पत्ती रोखण्यासाठी महापालिकेकडून तपासणी आणि दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

# कोलकात्यात दुर्गापूजेच्या मंडपात चेंगराचेंगरी; २० जणांचा मृत्यू

## मंडपाचा काही भाग कोसळल्यानंतर भाविकांची धावपळ । ४० हून अधिक जखमी, बचावकार्य युद्धपातळीवर

● **कोलकाता । वीरभूमी–**

पश्चिम बंगालमधील कोलकाता शहरात धक्कादायक घटना घडली आहे. दूर्गापूजेचा उत्सव साजरा करण्यासाठी जमा झालेल्या लोकांवर काळाने घाला घातला. दुर्गापूजेच्या उत्सवात शेकडो लोक सहभागी झाले होते. परंतु येथे अचानक चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीमुळे आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाला आहे. तब्बल ४० पेक्षा जास्त लोक जमखी झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर संपूर्ण देश हादरला आहे.

आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार कोलकाता शहरात सप्तमीच्या संध्याकाळी ही दुर्दैवी घटना घडली. येथे दुर्गापूजेसाठी आलेल्या लोकांची अडचण होऊ नये म्हणून मोठा मंडप टाकण्यात आला होता. या मंडपाचा काही भाग अचानक कोसळला. मंडप कोसळल्यानंतर लोकांनी मोठ्या प्रमाणात धावपळ केली. परिणामी पुढच्याच काही क्षणात मोठी चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत २० जणांचा मृत्यू झाल्याचे आतापर्यंत समोर आले आहे. मृतांचा हा आकडा आणखी वाढू शकतो. ४० पेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत.



ही घटना समोर येताच मदतकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. घटनास्थळी रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आहेत. बचावकार्य केले जात आहे. जखमी भाविकांना रुग्णालयात दाखल केले जात आहे. दुसरीकडे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी रुग्णालयात धाव घेतली असून जखमींची विचारपूस केली आहे. मुख्यमंत्र्यांसोबत मुख्य सचिव मनोज अग्रवाल हेदेखील कोलकाता शहरातील वैद्यकीय महाविद्यालयात पोहोचले आहेत.

दुसरीकडे ही घटना घडताच माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दु:ख व्यक्त केले. जखमी झालेल्या भाविकांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना त्यांनी केली. तसेच अशा कठीण काळात मी मृतांच्या कुटुंबीयांसोबत आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

या घटनेत जखमी झालेल्यांची मदत करण्यासाठी पश्चिम बंगालच्या सरकारने टोल फ्री नंबर जारी केला आहे. १८००३४५५६७८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सरकारने आवाहन केले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार या घटनेत अनेक लोक बेशुद्ध झाले आहेत. काही लोकांना दुचाकीवर बसवून रुग्णालयात नेण्यात आले.

### दुर्घटनेच्या चौकशीची मागणी

■ या चेंगराचेंगरीच्या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. गर्दी नियंत्रणासाठी केलेली व्यवस्था, मंडपातील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग तसेच आपत्कालीन सेवांची उपलब्धता यांची तपासणी होण्याची शक्यता आहे. आयोजक आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित व्यक्तींची पोलिसांकडून चौकशी सुरू असल्याचे वृत्त आहे.

### मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

■ या घटनेनंतर राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आल्याचे वृत्त आहे. मृतांच्या वारसांना प्रत्येकी २५ लाख रुपये आणि कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याबाबतही घोषणा झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्च सरकारकडून केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

### पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

■ या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याचे वृत्त आहे. इतर राजकीय नेत्यांनीही या घटनेबद्दल शोक व्यक्त करत पीडित कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. या दुर्घटनेमुळे सार्वजनिक उत्सवांमध्ये गर्दीचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन मदत यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# शेतकऱ्यांसह मजूरही दुबार संकटात!

● **मुंबई । वीरभूमी–**

शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आणि बांधकाम हा रोजगाराचा मोठा आधार आहे. मात्र, यंदाच्या दुष्काळाने या दोन्ही क्षेत्रांसमोर संकट उभे केले आहे. पावसाची तूट, खालावलेली भूजल पातळी आणि धरणांमधील मर्यादित पाणीसाठा यामुळे पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची वेळ आली आहे. त्याचाच परिणाम आता बांधकाम क्षेत्रावर होत आहेत.

दुष्काळाचे दशावतार आता केवळ शेतशिवारातच नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेतही दिसू लागले आहेत. पाण्याच्या टंचाईमुळे कुठे सिमेंट रस्त्यांची कामे थांबवली जात आहेत, तर कुठे बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी घालण्यात आली. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असलेल्या बांधकाम क्षेत्रापुढे आता नवे संकट उभे ठाकले आहे. बांधकामांची कामे मंदावली, तर त्याचा थेट परिणाम मजूर, गवंडी, सेंट्रिंग कामगार, ट्रकचालक, सिमेंट विक्रेते आणि या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो छोट्या व्यावसायिकांवर होऊ शकतो. आधी शेतीने रोजगार हिरावला आणि आता बांधकाम क्षेत्रालाही दुष्काळाची झळ बसू लागली, तर या मजुरांनी जगायचं कसं? असा प्रश्न साऱ्यांना सतावतो आहे. दुष्काळाच्या या नव्या आर्थिक संकटानं चिंतेत भर घातल्याचे चित्र आहे.

राज्यात ३५८ पैकी ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झालाय. त्यात राज्यातील सुमारे ८५ टक्के तालुके दुष्काळाच्या कक्षेत असून पावसाची तूट सुमारे १८ टक्के आहे. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, राज्य सरकारने १६ ऑक्टोबरपासून शहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना किमान दहा टक्के पाणी कपात लागू करण्याचे निर्देश दिलेत.

पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यासोबतच बांधकामासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्यावर भर देण्यात आलाय. पुण्यात पिण्याच्या पाण्याचा बांधकामासाठी वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर नागपुरात पाणीटंचाईमुळे सिमेंट रस्त्यांच्या पाचव्या टप्प्यातील काम थांबवण्यात आले आहेत. म्हणजेच दुष्काळाचा फटका आता प्रत्यक्ष बांधकामांच्या कामांपर्यंत पोहोचला आहे. दरम्यान, राज्यात १६ ऑक्टोबरपासून किमान १०% पाणी कपातीचे निर्देश देण्यात आले आहे. यात पुण्यात बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी घालण्यात आली. बांधकाम क्षेत्राचं महत्त्व केवळ इमारती उभ्या करण्यापुरतं मर्यादित नाही. सिमेंट, स्टील, वाळू, विटा, वाहतूक, हार्डवेअर आणि मजुरांची रोजीरोटी अशा अनेक व्यवसायांची अर्थव्यवस्था याच्याशी जोडलेली आहे.

# भंडारदरा-निळवंडे धरणातील पाणीवापराचा हिशेब द्या

## आ. किरण लहामटे । आतापर्यंत सोडलेल्या पाण्याचा तपशील व पुढील आवर्तनाचे नियोजन मागविले

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले विधानसभा मतदारसंघातील भंडारदरा व निळवंडे धरणे चालू वर्षात कोणत्या तारखेला पूर्ण क्षमतेने भरली, तसेच धरणे पूर्ण भरल्यानंतर नदीपात्रातून आणि कालव्यांमधून पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीच्या सिंचनासाठी आजपर्यंत किती पाणी सोडण्यात आले, याचा सविस्तर तपशील उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांना पत्र दिले आहे. या पत्रातून धरणांतील पाणीवापर, आवर्तनाचे नियोजन आणि अकोले तालुक्याच्या पाण्याच्या वाट्याबाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे.

प्रवरा नदीचे पाणी पिण्यासाठी आणि शेतीसाठी नियमानुसार कोणत्या कालावधीत सोडणे अपेक्षित होते, प्रत्यक्षात आजपर्यंत किती पाणी सोडण्यात आले आहे आणि त्याचे



नियोजन कोणत्या पद्धतीने करण्यात आले आहे, याचीही माहिती देण्यात यावी, अशी मागणी आ. लहामटे यांनी केली आहे.

तसेच निळवंडे व भंडारदरा धरणांतून पुढील काळात पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीसाठी किती आवर्तने सोडण्यात येणार आहेत, जुलै २०२७ अखेरपर्यंत त्याचे नियोजन कशा पद्धतीने करण्यात आले आहे, याची माहितीही तातडीने देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अकोले तालुक्याच्या वाट्याचे किती पाणी शेतीसाठी आणि पिण्यासाठी राखून ठेवण्यात येणार आहे, तसेच उच्चस्तरीय कालव्यांना कधीपर्यंत पाणी देण्यात येणार आहे, या सर्व बाबींची संपूर्ण माहिती आपल्याला तातडीने अवगत करून द्यावी, असेही आ. लहामटे यांनी पत्रात नमूद केले आहे.

पाण्याच्या नियोजनाबाबत स्पष्टता न झाल्यास अकोले तालुक्यात उग्र आंदोलन उभे राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी आणि प्रशासनावर राहील, असा इशाराही आ. लहामटे यांनी दिला आहे.

पाण्यावर पहिला हक्क अकोल्याचा आहे, याची जाणीव प्रशासनाने ठेवावी, असे स्पष्ट करत त्यांनी भंडारदरा व निळवंडे धरणातील पाण्याचे आवर्तन आणि अकोले तालुक्याच्या वाट्याचे पाणी याबाबत तातडीने पारदर्शक माहिती देण्याची मागणी केली आहे.

# टंचाईच्या काळात लोकसहभागातून जलजागृतीवर भर

## आनंद भंडारी । मोहोजदेवढे येथील आशापुरा देवी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त घेतले दर्शन

● **पाथर्डी । वीरभूमी–**

आगामी सुमारे दहा महिन्यांचा कालावधी जिल्ह्यासाठी टंचाईच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हाभर जलजागृती आणि पाणीबचतीचे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात अंगणवाडी, बचत गटांसह जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांना सहभागी करून घेतले जाणार आहे. प्रत्येक गावाने टंचाईचा सामना करण्यासाठी लोकसहभागातून पुढाकार घ्यावा. सर्व परिस्थितीत आणि संकटाच्या काळात शासन व प्रशासन पूर्ण ताकदीने जनतेच्या पाठीशी आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

तालुक्यातील मोहोजदेवढे येथील आशापुरा देवी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित दर्शन सोहळा तसेच टंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांशी आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर महाराज देवढे होते.

यावेळी नगरसेवक अजय भंडारी, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, व्यापारी संघटनेचे निलेश खाबिया, डॉ. स्मिता भंडारी, भारती असलकर, सुमित्रा वेताळ, रोहिदास आघाव, माजी सरपंच गणेश चितळकर, कांता बापू देवढे, राधाकिसन देवढे, प्रेमचंद खंडागळे, भाऊसाहेब देवढे, अविनाश मंत्री, अनिल खाटेर, राजेंद्र सावंत यांच्यासह ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहोजदेवढे येथे जिल्ह्यातील एकमेव आशापुरा देवीचे मंदिर असल्याचे सांगण्यात आले. या देवीचे मुख्य स्थान राजस्थान येथे आहे. जिल्ह्यातील



राजस्थानी समाजातील ज्या भाविकांचे कुलदैवत आशापुरा देवी आहे, ते भाविक मोहोजदेवढे येथे आवर्जून दर्शनासाठी येतात. येथे पारंपरिक पद्धतीने पूजा–विधी केला जातो. राजस्थानला जाऊन पूजा–विधी करणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी हे मंदिर श्रद्धेचे महत्त्वाचे स्थान ठरले आहे.

आनंद भंडारी म्हणाले की, ग्रामीण जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. त्याचबरोबर बदलत्या हवामानानुसार पीकपद्धतीत बदल करून शेती करण्याची गरज निर्माण झाली आहे. पारंपरिक पद्धतीची शेती गेल्या काही काळापासून तोट्यात जात असल्याने पशुधन, फळबागा आणि चारा पिकेही धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकरी सर्व बाजूंनी अडचणीत आला असून ग्रामीण अर्थचक्र विस्कळीत झाले आहे.

पाणीबचतीवर सर्वच घटकांनी गांभीर्याने काम करण्याची गरज आहे. बचत गटांची चळवळ अधिक सक्रिय करून जलजागृती अभियान राबवावे लागेल. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी जिल्हाभर आढावा बैठक घेऊन विशेष उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचे आदेश दिले आहेत. अडचणीच्या काळात शासन आणि प्रशासन दोन्ही जनतेच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे आहेत. टंचाईचा सामना सर्वांनी एकत्रितपणे करायचा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारणाशी संबंधित कामांना प्राधान्य दिले जाईल. तलाव आणि बंधाऱ्यांची दुरुस्ती, गाळ काढणे आदी कामे हाती घेतली जावीत. यामुळे आगामी काळासाठी जिल्ह्याची पाणी साठवण क्षमता वाढण्यासोबतच भूगर्भातील पाणीपातळी वाढण्यास मदत होईल, असे भंडारी यांनी सांगितले.

जिल्ह्यात सर्वाधिक टंचाईची तीव्रता पाथर्डी तालुक्यात असून प्रशासनाचे या तालुक्यावर विशेष लक्ष आहे. दैनंदिन स्थानिक यंत्रणेबरोबरच जिल्हास्तरीय सर्व यंत्रणा संपर्कात राहून उपाययोजनांबाबत तातडीने निर्णय घेत आहेत. आगामी काळ अत्यंत कष्टदायक असल्याने सर्वांनी प्रत्येक बाबतीत सतर्कता बाळगावी. लोकसहभागाशिवाय शासन किंवा प्रशासन एकट्याने कोणतीही उपाययोजना प्रभावीपणे राबवू शकत नाही, असेही आनंद भंडारी यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य संयोजक राजेंद्र देवढे यांनी केले, तर आभार गोविंद रुपनर यांनी मानले.

# अकार्यक्षम मंत्र्यांना मिळणार डच्चू

● **मुंबई । वीरभूमी–**

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर अकार्यक्षम मंत्र्यांच्या कामांवर एकनाथ शिंदे नाराज आहेत. अडीच वर्षांचा कार्यकाळ संपत आला असून लवकरच शिंदेसेनेतील अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू दिला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात आता चर्चांना उधाण आले आहे.

असे देखील सांगितले जात आहे की, तरुण आमदारांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडण्याची शक्यता आहे. तर काही राज्यमंत्र्यांना कॅबिनेटमंत्री पद देत त्यांची पदोन्नती केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ज्या मंत्र्यांना डच्चू दिला जाणार आहे त्या यादीमध्ये संजय शिरसाट, संजय राठोड, दादा भुसे, गुलाबराव पाटील यांची नावं असल्याचे सांगितले जात आहे. राज्यमंत्रिपदी असलेले योगेश कदम, आशिष जयस्वाल या दोघांना राज्यमंत्रिपदावरून थेट कॅबिनेट मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. तर काही नव्या आमदारांना देखील मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील शिंदेसेनेतील मंत्र्यांच्या कामगिरीवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याचे सांगितले जात आहे. एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांची बैठक बोलावून नाराजी व्यक्त केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना कामकाजात सुधारणा करण्याची तंबी दिली. जनतेची कामं, मतदारसंघातील प्रश्न आणि पक्षसंघटनेच्या वाढीकडे लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वीही कामगिरी सुधारली नाही तर मंत्रिपद गमवावे लागू शकते, असा इशारा शिंदेंनी दिल्याचे वृत्त आहे.

दुष्काळामुळे शेतकरी संकटात आहे. असे असताना शिंदेसेनेच्या मंत्र्यांना आपले मतदारसंघ सोडूशी वाटत नाही त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त करत या मंत्र्यांना तंबी दिली होती. राज्यात दुष्काळाची परिस्थिती असताना मंत्री जबाबदारी असलेल्या जिल्ह्यांचे दौरे का करत नाही? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी बैठकीत केला होता. ज्या मंत्र्यांना ज्या जिल्ह्याची जबाबदारी दिली आहे त्या मंत्र्यांनी दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचा दौरा करण्याचे आदेश शिंदेंनी दिले.

# SPOT NEWS

## वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेल्या प्रिशा आठरे हिचा वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेटकडून सत्कार

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**



सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीगोंदा मुले येथील कु. प्रिशा प्रदीप आठरे हिने लहान गटातून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीतर्फे तिचा सत्कार करण्यात आला. प्रिशा हिने यापूर्वी केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळविला होता. त्यानंतर तालुकास्तरीय स्पर्धेतही अव्वल स्थान मिळवत तिने आपल्या वक्तृत्वाची छाप उमटवली. तिच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे आणि विषयाच्या प्रभावी मांडणीचे कौतुक होत आहे. प्रिशा हिला केंद्रप्रमुख उत्तरेश्वर मोहोळकर, मुख्याध्यापक अनिल तिखे, वर्गशिक्षिका अर्चना ढगे आणि मार्गदर्शक विद्या हराळ यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक चेअरमन विठ्ठलराव वाडगे, सायली वाडगे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना गावडे यांनी प्रिशाचा सत्कार करून तिचे अभिनंदन केले. तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसह वक्तृत्व क्षेत्रातील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये दांडियाचा जल्लोष; विद्यार्थिनींसह शिक्षिकाही थिरकल्या!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

दिवसभर कामकाज व कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून रात्री शिक्षण घेणाऱ्या महिला व युवतींनी नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित दांडिया व रास-गरब्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थिनी, शिक्षिका व संस्थेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी दांडियाच्या तालावर ठेका धरला. रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना सण-उत्सवांचा आनंद घेता यावा, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि शिक्षणाच्या प्रवासात आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेत एकूण ५८९ विद्यार्थी असून त्यापैकी २७७ महिला व युवती आहेत. कार्यक्रमाला हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी, माजी चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या माहेश्वरी गावित यांच्यासह शहरातील विविध शाळांच्या महिला प्राचार्या, मुख्याध्यापिका व शिक्षिका उपस्थित होत्या. रात्रशाळेचे प्राचार्य सुनील सुसरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पाहुण्यांना तुळशीची रोपे भेट देण्यात आली. डॉ. पारस कोठारी यांनी रात्रशाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांचा परिवार असल्याचे सांगितले. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना विविध सण-उत्सवांचा आनंद मिळावा आणि त्यांच्यात आपुलकीची भावना वाढावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. शहरातील विविध शाळांच्या मुख्याध्यापक व मुख्याध्यापिकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून महिला मुख्याध्यापिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. दांडिया व रास-गरब्यात विद्यार्थिनींनी बहारदार नृत्य सादर केले. शिक्षकांनीही विद्यार्थिनींसोबत दांडियाचा आनंद घेतला. रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषा आणि उत्साही वातावरणामुळे शाळेचे मैदान नवरात्रोत्सवाच्या जल्लोषाने भारावून गेले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष अनंत देसाई, मानद सचिव सुमतीलाल कोठारी, माजी मानद सचिव संजय जोशी, तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षिका वृषाली साताळकर, स्वाती होले व अनुराधा दरेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सेंट सेव्हिअर्सच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धांत पदकांची लयलूट!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्हा क्रीडा कार्यालय आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अंतर्गत झालेल्या विविध जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सेंट सेव्हिअर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. खेळाडूंनी एकूण १० सुवर्ण, ७ रौप्य आणि ६ कांस्यपदके पटकावली. मल्लखांब, योगासने, शूटिंग, कराटे, वुशू, तायक्वांदो, कॅरम आणि गोळाफेकमध्ये त्यांनी कौशल्य सिद्ध केले. १४ वर्षांखालील गटात आरेज मुजद्दीन सय्यदने कराटेत कांस्य, अखिफा जहीर मुनावरने रौप्य, झिक्रा फैजान शेखने कांस्य, तर मुजम्मिल मुजसलने कॅरममध्ये कांस्यपदक मिळविले. १७ वर्षांखालील गटात सपुरा शेखने कराटे व वुशूमध्ये सुवर्णपदके मिळविली. चैतन्य गंधाडेने शूटिंग, तर सार्थक मस्केने मल्लखांबमध्ये सुवर्णपदक पटकावले. शेख उमान कुसुम वसीमने तायक्वांदोमध्ये रौप्य व कराटेत कांस्य, तम्मिम सय्यद जावेदने कराटेत रौप्य व वुशूमध्ये कांस्य, तर मुआज शेखने कराटे व वुशूमध्ये रौप्यपदक मिळविले. १९ वर्षांखालील गटात वेदांत क्षत्रियने गोळाफेकीत रौप्यपदक मिळविले. योगासनात आरती पवार व आर्शिन शेख यांनी आर्टिस्टिक पेअर, समायरा डाकुआ व खुशी लोंढे यांनी रिदमिक पेअर, तर सार्थक झा व सोहम विधाते यांनी आर्टिस्टिक पेअर प्रकारात सुवर्णपदक पटकावले. स्तुती धुमाळने ट्रॅडिशनल योगात रौप्य, तर विशाल मुंढेने कांस्यपदक मिळविले. या यशाबद्दल व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप काकडे, प्राचार्या ज्योत्स्ना शिंदे, पर्यवेक्षिका संध्या खरात, ज्येष्ठ शिक्षिका प्रतिभा काकडे, जॉन सोनवणे व डेव्हिड पाटोळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# ऊसदर जाहीर करा, अन्यथा गव्हाणी बंद आंदोलन!

**भातुकडगाव फाटा व घोटण येथे वाहने अडवून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन । एक-दोन दिवसांत कारखान्यांवर धडक देण्याचा इशारा**

**● शेवगाव । वीरभूमी –**

अहिल्यानगर येथे दि. ५ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार साखर कारखानदारांनी अद्याप ऊसदर जाहीर केलेला नाही. त्यातच साखरेच्या विक्रीदरात वाढ होऊनही त्याचा लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिला जात नसल्याचा आरोप करत स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. ऊसदर जाहीर करण्याच्या मागणीसाठी संघटनेच्या वतीने तालुक्यातील भातुकडगाव फाटा व घोटण येथे वाहने अडवून आंदोलन करण्यात आले.



कारखानदारांनी येत्या एक-दोन दिवसांत ऊसदर जाहीर न केल्यास प्रत्यक्ष साखर कारखान्यांवर जाऊन गव्हाणी बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने साखर कारखानदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. सन २०२६-२७च्या गळीत हंगामासाठी प्रतिटन ५,५०० रुपये ऊसदर मिळावा, सन २०२५-२६मध्ये जास्त दराने विक्री झालेल्या साखरेमागे प्रतिटन ५०० रुपये अनुदान मिळावे, शासनाने साखरेची आधारभूत किंमत प्रतिकिलो ५० रुपये करावी, तसेच बी-हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा, अशा मागण्या संघटनेने केल्या आहेत.

याशिवाय मागण्या मान्य होईपर्यंत कारखान्यातील साखर बाहेर जाऊ दिली जाणार नाही, कारखान्यांमधील वजनकाटे बिनचूक असावेत आणि ऊस वजनाची प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी, अशी भूमिकाही संघटनेने घेतली आहे.

ऊस गळीत हंगाम सुरू झाला असतानाही कारखानदारांकडून ऊसदर जाहीर करण्यात न आल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर मिळावा, त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळावा आणि साखरेच्या वाढत्या दराचा लाभ ऊस उत्पादकांनाही मिळावा, या मागण्यांसाठी संघटनेने आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

कारखानदारांनी ऊसदर जाहीर करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा येत्या एक-दोन दिवसांत प्रत्यक्ष साखर कारखान्यांवर जाऊन गव्हाणी बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. आंदोलनादरम्यान ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना समज देत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याची भूमिका जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी घेतली.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, सहसचिव बाळासाहेब फटांगडे, मच्छिंद्र आरले, बाळासाहेब गरजे, रमेश कचरे, संतोष गायकवाड, चंद्रकांत धारगड, अमोल देवढे, अंबादास भागवत यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अनेक पदाधिकारी व शेतकरी सहभागी झाले.

## छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या आवारात आढळलेल्या जखमी गव्हाणी घुबडाला श्रीगोंद्यात मिळाले जीवनदान

**वनविभागाच्या तत्परतेने उपचारांसाठी पुण्यातील रेस्क्यू सेंटरकडे रवाना**



**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शेतकऱ्याचा मित्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जखमी गव्हाणी घुबडाला श्रीगोंद्यात वेळीच मदतीचा हात मिळाला. छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या आवारात शनिवारी सकाळी हे घुबड आढळून आले. त्याला उडण्याचीही ताकद नसल्याचे लक्षात आल्यानंतर प्रा. शंकर गवते यांनी तत्काळ वनविभागाला याची माहिती दिली.

वनपरिक्षेत्र अधिकारी दिपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक राजेंद्र जाधव आणि चंद्रकांत मरकड यांनी घुबडाला सुरक्षित ताब्यात घेतले. पुढील उपचारांसाठी त्याला पुण्यातील बावधन येथील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टकडे सुपूर्द करण्यात आले.

गव्हाणी घुबडाच्या चेहऱ्याचा आकार हृदयासारखा असतो. प्रामुख्याने रात्री सक्रिय असलेला हा पक्षी उंदीर आणि घुशींची शिकार करून पिकांचे नुकसान कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे त्याला 'शेतकऱ्याचा मित्र' म्हणून ओळखले जाते. घुबडाबाबत समाजात असलेल्या अंधश्रद्धा दूर करून पर्यावरणातील त्याचे महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे.

या बचावकार्यात प्रा. सुरेश रसाळ, प्रा. बाळकृष्ण महारानोर, प्रा. डॉ. धर्मनाथ काकडे, प्रा. शंकर गवते आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. शिक्षकांनी दाखविलेली संवेदनशीलता आणि वनकर्मचाऱ्यांनी केलेली तत्पर मदत याबद्दल वन्यजीवप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले.

एका जखमी पक्ष्याला मिळालेली मदत म्हणजे केवळ त्याचा जीव वाचविण्याचा प्रयत्न नव्हे, तर निसर्गाशी असलेले आपले नाते जपण्याचा आणि वन्यजीवांप्रती संवेदनशीलता दाखविण्याचा आदर्श आहे.

## कलेतून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला आणि सर्जनशीलतेला मिळते बळ : संग्राम दाते

**● पारनेर । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित करण्यासाठी चित्रकला आणि विविध कलांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते, तसेच आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही बळ मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच चित्रकला, रंगकाम आणि इतर कलात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपल्यातील कलागुण विकसित करावेत, असे आवाहन रंगोत्सव सेलिब्रेशन ऑर्गनायझेशनचे चेअरमन संग्राम दाते यांनी केले.




पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेचे महत्त्व, चित्रकला स्पर्धांमधील सहभाग तसेच विविध कलागुणांच्या विकासाविषयी सविस्तर माहिती दिली.

संग्राम दाते यांनी विद्यार्थ्यांना कलेच्या क्षेत्रातील विविध संधींची जाणीव करून दिली. चित्रकलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना प्रभावीपणे व्यक्त करता येतात, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष कलागुण असतात. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि प्रोत्साहन मिळाल्यास हे गुण विकसित होऊन विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्याची संधी मिळू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रंगोत्सव सेलिब्रेशन ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रकलेसह विविध कलांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षक राजाराम जगदाळे (कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, देहू, पुणे), जिल्हा परिषद शाळेचे केंद्रप्रमुख सुहास खरमाळे, पत्रकार गणेश जगदाळे, टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र ठुबे, आदर्श शिक्षक प्रवीण झावरे आणि सचिन ठाणगे उपस्थित होते.

यावेळी शाळेतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच अन्य मान्यवरांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये कलेविषयी आवड आणि प्रेरणा निर्माण करणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## कृष्णा कलेक्शनसारखी दालने उभी राहणे ही कोपरगावच्या प्रगतीची साक्ष : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

शहरात दळणवळणासाठी रस्ते, पिण्याच्या पाण्याची समस्या संपुष्टात आल्यामुळे निश्चितपणे व्यापारवृद्धी झाली असून शेजारच्या तालुक्यातील प्रसिद्ध व्यापारी आपल्या कोपरगाव शहरात येवून व्यवसायासाठी मोठी गुंतवणूक करीत आहेत हि अतिशय समाधानाची बाब आहे. कोपरगाव शहरात कपडे, सोने-चांदी, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फर्निचरची आणि वाहनांची शोरूम यापूर्वीच सुरु झाली असून कृष्णा कलेक्शनचे दालन देखील आपल्या कोपरगाव शहरात सुरु होत आहे हे कोपरगावच्या वाढत्या आर्थिक क्षमतेची आणि प्रगतीची साक्ष असल्याचे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

कोपरगाव शहरात श्रीरामपूर येथील सुप्रसिद्ध कृष्णा कलेक्शनच्या सुरु करण्यात आलेल्या नूतन दालनाचे उदघाटन राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री. राधाकृष्ण विखे पा. यांच्या हस्ते व आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, कोपरगाव मतदार संघाच्या विकासासाठी स्व. अजितदादा पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठ्या प्रमाणावर निधी देऊन सहकार्य केले आहे. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी देखील जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून कोपरगाव नगरपरिषदेला निधी उपलब्ध करून देत शहर विकासाला हातभार लावला आहे व यापुढेही कोपरगावच्या विकासासाठी त्यांचे सहकार्य असेच मिळत राहील याचा मला विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले.

कोपरगावकरांनी आपल्या शहरातील व्यापाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, स्थानिक बाजारपेठेतूनच खरेदी करावी आणि आपल्या पैशातून आपल्या शहराच्या अर्थव्यवस्थेला बळ द्यावे. स्थानिक व्यापाराची भरभराट म्हणजे रोजगाराच्या नव्या संधी, व्यापाऱ्यांची आर्थिक समृद्धी आणि कोपरगावच्या सर्वांगीण विकासाला मिळणारी नवी दिशा आहे. त्यामुळे येणाऱ्या दिवाळी सणाची खरेदी स्थानिक व्यापाऱ्यांकडून करा त्यामाध्यमातून कोपरगावात आर्थिक समृद्धी नांदणार असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले.



यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, आ. विवेक कोल्हे, गोदावरी खोरे दूध संघांचे चेअरमन राजेश परजणे, तहसीलदार महेश सावंत, कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे, समता उद्योग समूहाचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, शिर्डीचे उपनगराध्यक्ष अभय शेळके, राहुल कोताडे, अजित कोताडे, सुनिल गलांडे, पुरुषोत्तम झंवर, जयेश डागा, कृष्णा झंवर, करण झंवर, डॉ. शैलीताई झंवर, संस्कृती झंवर, राघव डागा, विनीत जाजू, झंवर कुटुंबीय, आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर व कोपरगाव शहर व ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत वामनभाऊ तरुण मंडळातर्फे मोहटादेवीच्या भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप

**खा. नीलेश लंके, नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन । सलग दुसऱ्या वर्षी सेवाकार्य**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची सेवा करण्याच्या उद्देशाने संत वामनभाऊ तरुण मंडळाच्या वतीने शेवगाव रोडवरील संत वामनभाऊ नगर येथे मोफत साबुदाणा खिचडी व फराळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. खासदार नीलेश लंके, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड आणि ड. सचिन बडे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

नवरात्रोत्सवाच्या काळात राज्यभरातून हजारो भाविक मोहटादेवीच्या दर्शनासाठी पायी प्रवास करतात. प्रवासादरम्यान भाविकांना अल्पोपाहार उपलब्ध करून देत त्यांच्या सेवेत सहभागी होण्याचा मंडळाचा हा उपक्रम आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष असून, मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भाविकांना फराळाचे वाटप केले.

मंडळाचे अध्यक्ष सचिन नागापुरे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मंडळाच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. सामाजिक, आध्यात्मिक, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत मंडळाच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

नगराध्यक्ष अभयकाका आव्हाड म्हणाले, पाथर्डी शहरासह संपूर्ण तालुक्यात सामाजिक कार्यात संघटितपणे आणि सातत्याने योगदान देणारे संत वामनभाऊ तरुण मंडळ हे अग्रेसर मंडळ आहे. सेवाभावी वृत्तीने सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देणारे कार्यकर्ते हे मंडळाचे वैशिष्ट्य आहे. मंडळाच्या हातून असेच सेवाकार्य निरंतर घडत राहो, अशी प्रार्थना आई जगदंबेच्या चरणी करतो.

खासदार नीलेश लंके म्हणाले, मागील वर्षीही भर पावसात याच मंडळाने उत्साहाने भाविकांसाठी फराळ आणि फळवाटपाचा उपक्रम राबविला होता. यंदाही सलग दुसऱ्या वर्षी या सेवाकार्याच्या उद्घाटनाचा मान मंडळाने दिला, याचा आनंद आहे. देण्याची वृत्ती आणि समाजसेवेची तळमळ असलेले हे मंडळ संत वामनभाऊ बाबांच्या आशीर्वादाने सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे.

निसर्गाविषयी जाणीव आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या मंडळाचे कार्य कौतुकास्पद असून, मंडळाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा, असेही खासदार लंके यांनी सांगितले.

यावेळी मंडळाचे माजी अध्यक्ष संतोष गायकवाड, नगरसेवक नंदकुमार शेळके, डॉ. जगदीश मुने, बंडूशेठ बोरुडे, विष्णुपंत पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवशंकरदादा राजळे, मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, बबन अण्णा गायकवाड, रामकिसन सरोदे, किशोर बाफना, दिलीप गायकवाड, किरण शहा, दादा उदमले, सुभाष गव्हाणे आणि सुभाष भागवत आदी उपस्थित होते.

मंडळाचे सदस्य गणेश खाडे, प्रदीप मगर, सचिन झेंड, डॉ. चंद्रकांत बारगजे, सिद्धार्थ गायकवाड, भूषण नागापुरे, कृष्णा जेधे, ऋषिकेश गायकवाड, वरद भालेराव, सुजल गाडे, यश जेधे, राम दराडे, संदीप पानखडे आणि प्रवीण आव्हाड यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी भाविकांच्या सेवेत सहभाग घेतला.



# SPOT NEWS

## निमगाव वाघात पर्यावरण संवर्धनाचा संदेश नवरात्रोत्सवानिमित्त वृक्षारोपण

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने गावातील रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करण्यात आले. केवळ वृक्षलागवड करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही संस्थेने स्वीकारली आहे. जिल्हा परिषदेच्या 'नवरात्री स्वच्छता उत्सव' या उपक्रमांतर्गत संस्थेच्या वतीने गावात स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती केली जात आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात धार्मिक उपक्रमांसोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे आणि पर्यावरणपूरक संदेश देणारे उपक्रम राबविण्यावर संस्थेच्या वतीने उपक्रम राबविण्यात येत असून, त्या अनुषंगाने वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी वृक्षारोपण केले. वृक्षलागवडीमुळे परिसरातील हरित क्षेत्र वाढण्यास मदत होणार असून, भविष्यात या झाडांमुळे नागरिकांना सावली मिळण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागणार आहे. मात्र, वृक्षारोपणासोबतच झाडांना नियमित पाणी देणे, त्यांचे संरक्षण करणे आणि त्यांची योग्य वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याने संस्थेच्या वतीने वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. वाढते तापमान, पर्यावरणातील असमतोल आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. केवळ एखाद्या कार्यक्रमापुरते वृक्षारोपण मर्यादित न ठेवता लावलेली झाडे जगविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. हाच विचार पुढे ठेवून निमगाव वाघा येथे हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे पै. नाना डोंगरे यांनी सांगितले. वृक्षरोपण करण्यासाठी मयूर काळे, कार्तिक डोंगरे, वरद ठाणगे यांनी परिश्रम घेतले.

## एमआयडीसीच्या रेणुका माता मंदिरात युवा सेनेच्या वतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त दर्शनासाठी आलेल्या भाविकांना युवा सेनेच्या वतीने खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. तर राज्यातील दुष्काळ हटावा याकरिता पाऊसासाठी रेणुका माता चरणी साकडे घालण्यात आले. पाऊस पडून बळीराजाला सुख-सुमृध्दी येण्यासाठी प्रार्थना करण्यात आली. युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्या पुढाकारातून खिचडी व फळ वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा तब्बल दोन हजार भाविकांनी लाभ घेतला. युवा सेनेने धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने भाविकांची सेवा करण्याच्या उद्देशाने राबविला. नवरात्रोत्सवानिमित्त श्री रेणुका माता देवस्थानात दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. सातव्या माळेनिमित्त मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी असते. भाविकांना उपवासाच्या काळात खिचडी व फळांचा लाभ मिळावा, या उद्देशाने युवा सेनेच्या वतीने वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसरात नियोजनबद्ध पद्धतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमात युवा सेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख संभाजी कदम, रणजीत परदेशी, विक्रम राठोड, दत्तात्रय तापकीरे, श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, शंकर शेळके, अमित बारवकर, सुनील शेवाळे, विशाल गीते, सागर गलांडे, वैष्णव गलांडे, शिव वाकळे, पवन शिरसागर, शिवराज गलांडे, गौरव पाटोळे, अमोल घुटे, स्वप्निल भरड, अजिनाथ शिरसाट, अभिजीत सांबारे, जितेंद्र तळेकर, वसीम शेख, अमोल ठोकळ, सचिन खेसे, अमोल म्हेत्रे, नामदेव झेंडे, फिरोज शेख, किसन तरटे, शरद थोरात, सोमनाथ आंधळे, रामनाथ घुगे, विष्णू घुगे, भरत दिंडे, राहुल मेहेरखाब, नितीन खेसे, अविनाश कर्डिले, संदीप मगर, तुषार शेवाळे, अशोक भगत, सागर पवार, हर्षवर्धन वाकळे, गुरु वाकळे, चैतन्य वाकळे, यश नर्सिंगपुरकर, सोमनाथ बारबोले, विक्रम नितनवरे, सुशील पवार, प्रवीण सोनवणे, वाल्मीक पाटील, सागर घोडके आणि अमोल पालवे यांच्यासह युवा सेनेचे कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले की, युवा सेनेच्या माध्यमातून नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा सर्वसामान्य नागरिक, कष्टकरी कामगार आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना लाभ झाला. धार्मिक सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न युवा सेनेकडून केला जात आहे. सामाजिक बांधिलकी जपत अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले की, युवा सेना धर्म, सेवा आणि समाजकारण या विचारांना केंद्रस्थानी ठेवून समाजात योगदान देत आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांशी जोडले जाण्याचे काम युवा सेनेकडून केले जात आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी पाणी बचतीची जनजागृती करावी!

### आ. डॉ. किरण लहामटे यांचे आवाहन । अकोले तालुका मेडिकल असोसिएशनचा 'आत्मा शारदीय नवरात्रोत्सव व रास-दांडिया महोत्सव'

**अकोले । वीरभूमी–**

वैद्यकीय व्यवसायातील धकाधकीच्या दिनचर्येतून डॉक्टरांना विरंगुळा मिळावा, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, परस्परांतील स्नेहबंध दृढ व्हावेत आणि सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा मिळावी, या उद्देशाने अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमांचा एक भाग असलेला 'आत्मा शारदीय नवरात्रोत्सव २०२६ व भव्य रास-दांडिया महोत्सव' गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता महाराजा लॉन्स, अकोले येथे उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाला आमदार डॉ. किरण लहामटे, नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सोनालीताई नाईकवाडी, पुष्पाताई लहामटे, गिरिजाताई पिचड, अकोले ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब मेहेत्रे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. श्यामकांत शेटे, डॉ. उमा कुलकर्णी, डॉ. अनिल वाघ, डॉ. सखाराम घनकुटे आणि डॉ. गणेश नवले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा, महिलांसाठीचे विशेष जनजागृती कार्यक्रम आणि विविध आरोग्य तपासणी शिबिरांचे कौतुक केले. दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित करत त्यांनी, डॉक्टरांनी रुग्णांच्या माध्यमातून गावोगावी पाणी बचतीची जनजागृती करावी, असे आवाहन केले.

डॉक्टरांचा समाजाशी थेट संपर्क असतो. त्यामुळे आरोग्यसेवेबरोबरच पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरणविषयक जनजागृतीसाठीही डॉक्टर प्रभावी भूमिका बजावू शकतात, असा संदेश त्यांनी दिला. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या असोसिएशनच्या कार्याचे अभिनंदन करून त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या रुग्णहिताच्या आणि समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले. डॉक्टरांच्या आरोग्याला प्राधान्य देतानाच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आनंद, उत्साह आणि एकोपा निर्माण करण्याचा असोसिएशनचा प्रयत्न स्तुत्य असल्याचे त्यांनी नमूद केले. नवरात्रोत्सव आणि गणेशोत्सवानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सोनालीताई नाईकवाडी यांनी 'आत्मा भवन'साठी नियोजित जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले. तसेच भविष्यात अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या विविध सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांना शक्य ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यांच्या या भूमिकेमुळे उपस्थित डॉक्टरांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संदीप कडलक यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. मंजुश्री राहणे आणि डॉ. अनुप्रिता शिंदे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले, तर असोसिएशनचे सचिव डॉ. प्रतीक घोडके यांनी आभार मानले.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. नीलेश सहाणे, डॉ. सागर कोल्हार, डॉ. तेजस शहा, डॉ. नितीन चासकर, डॉ. रवींद्र डावरे, डॉ. नूतन कडलग, डॉ. दिपाली बेलोशे, डॉ. कावेरी काकड, डॉ. मनीषा नाईकवाडी, डॉ. पूनम कानवडे, डॉ. मोहसीन शेख, डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. संतोष देशमुख, डॉ. प्रमोद कोंडावळे, डॉ. संतोष कानवडे, डॉ. आसिफ तांबोळी, डॉ. सुनील वैद्य, डॉ. दर्शन बंगाळ, डॉ. निमनाथ चौधरी आणि डॉ. सतीश वाळुंज यांनी विशेष परिश्रम घेतले.

रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, तालबद्ध संगीत, दांडियाचा ठेका आणि डॉक्टरांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे महाराजा लॉन्स परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. वैद्यकीय क्षेत्रातील व्यस्त दिनचर्येतून काही क्षण आनंदाचे अनुभवण्याबरोबरच परस्परांतील मैत्री, आपुलकी आणि संघभावना वृद्धिंगत करणारा हा महोत्सव संस्मरणीय ठरला.

आरोग्यसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक एकोपा यांची सुंदर सांगड घालणाऱ्या अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## हिरवे बंधूंवरील हल्ल्याचा सूत्रधार सुजित इथापेला बेलवंडी पोलिसांनी केले जेरबंद!

### डंपरच्या हप्त्याच्या वादातून झाला होता हल्ला

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

डंपरच्या हप्त्याच्या वादातून हिरवे बंधूंवर कोयता, तलवार आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी फरार असलेला सुजित इथापे याला बेलवंडी पोलिसांनी कुकडी कारखाना परिसरातून अटक केली. या गुन्ह्यातील सहा आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली होती.



१० सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ११.२५ वाजता निखिल, नितीन आणि अभिजित हिरवे हे चारचाकी वाहनातून जात असताना आरोपींनी स्विफ्ट कार आडवी लावून त्यांना अडवले. माती-मुरूम वाहतूक करणाऱ्या डंपरच्या हप्त्यांवरून झालेल्या वादातून त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. याप्रकरणी निखिल हिरवे यांच्या फिर्यादीवरून सुजित इथापे, सचिन उर्फ चिंग्या भागवत, गणेश गायकवाड, नितीन पवार यांच्यासह अन्य आरोपींविरुद्ध बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यानंतर सुजित इथापे फरार होता. तो कुकडी कारखाना परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच पथकाने सापळा रचून त्याला अटक केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल दादासाहेब क्षीरसागर, भाऊसाहेब यमगर, पोलीस कॉन्स्टेबल विनोद पवार, पोलीस नाईक शरद गांगार्डे तसेच अहिल्यानगर दक्षिण मोबाईल सेलचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## पारनेर येथील सेनापती बापट पतसंस्था प्रकरणी १२ जणांच्या मालमत्तांच्या व्यवहारांवर बंदी

### अध्यक्ष रामदास भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंजाड यांच्यासह १२ जणांचा समावेश

**पारनेर । वीरभूमी–**

पारनेर येथील सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेतील गैरप्रकारांच्या प्रकरणात संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले, उपाध्यक्ष अण्णासाहेब औटी, मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंजाड यांच्यासह १२ जणांच्या जमीन, घरे व इतर मालमत्तांच्या खरेदी-विक्री, हस्तांतरण तसेच बक्षीसपत्राच्या व्यवहारांवर बंदी घालण्यात आली आहे. या कारवाईमुळे संबंधित संचालकांमध्ये खळबळ उडाली आहे.

माजी आमदार विजय भास्कर औटी संस्थापक असलेल्या सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या ठेवीदारांना गेल्या दोन वर्षांपासून त्यांच्या ठेवी मिळत नसल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणी ठेवीदारांनी संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंजाड यांच्यासह बारा जणांविरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल करून गुन्हे दाखल केले आहेत. सध्या या प्रकरणाचा फॉरेन्सिक ऑडिट सुरू असून, ठेवीदारांच्या आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी संबंधित कायद्यानुसार कारवाई सुरू असल्याचे सांगण्यात आले.

व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आलेल्यांमध्ये संस्थेचे अध्यक्ष रामदास हनुमंत भोसले (रा. दरोडी, पारनेर), उपाध्यक्ष अण्णासाहेब भाऊसाहेब औटी (पारनेर), ॲड. पंडितराव सखाराम कोल्हे (लोणी हवेली, पारनेर), संभाजी शिवाजीराव सोमवंशी (जवळे, पारनेर), विलास दशरथ बालवडकर (बालेवाडी, पुणे), बाळासाहेब शामराव धोत्रे (अळकुटी, पारनेर), बाबाजी किसन तनपुरे (निघोज), संतोष गंगाधर चाहेर (दरोडी), भास्कर विठोबा जाधव (शेरी कासारी, पारनेर), मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास आनंदराव झंजाड (सुपा) आणि किरण कोंडीबा शिंदे (अळकुटी) यांचा समावेश आहे.

संबंधितांच्या मालमत्तांच्या खरेदी-विक्री, हस्तांतरण तसेच बक्षीसपत्राद्वारे हस्तांतरणाच्या व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या विद्यमान संचालकांच्या मालमत्तांवर निर्बंध घालण्यात आले असले, तरी संस्थेचे संस्थापक माजी आमदार विजय भास्कर औटी यांच्यासह स्थापनेपासून कार्यरत असलेल्या संचालक मंडळातील सदस्यांच्या मालमत्तांवरही फॉरेन्सिक ऑडिट पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालावेत, तसेच त्यांच्या मालमत्तांची खरेदी-विक्री व हस्तांतरण थांबवावे, अशी मागणी शिवराय सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष विनोद गोळे यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे केली आहे.

फॉरेन्सिक ऑडिटमधून संस्थेतील आर्थिक व्यवहारांचे संपूर्ण चित्र स्पष्ट होईपर्यंत संबंधित सर्व संचालकांच्या मालमत्तांबाबत खबरदारीची कारवाई करावी, अशी मागणीही गोळे यांनी केली आहे.

## 'ये हंसावरती बसून शारदे, मयुरावरती बसून!' अभंगवाणीने वरखेड माता मंदिरात भक्तिमय वातावरण

**पारनेर । वीरभूमी –**

पारनेर शहरातील वरखेड मळा येथील श्री वरखेड माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त भास्कर हांडे, मंदा हांडे, विद्याताई देशमुख आणि प्रकाश देशमुख यांच्या सौजन्याने अहिल्यानगर येथील ज्ञानमाऊली भजनी मंडळाच्या वतीने भक्तिमय भजनसेवेचे आयोजन करण्यात आले. 'ये हंसावरती बसून शारदे, मयुरावरती बसून!' या भक्तिगीतासह 'अलीकडे डोंगर, पलीकडे डोंगर, वणीच्या देवीला' या लोकप्रिय गीताने उपस्थित भाविकांची मने जिंकली.

देवीची विविध गाणी, अभंगवाणी, भजन, भारूड, जोगवा, देवीचा जागर, दांडिया, देवीचा पोत आणि भंडाऱ्याच्या गीतांनी मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. पारंपरिक गोंधळ, जागरणाची गाणी आणि देवीच्या आरतीने कार्यक्रमात विशेष रंग भरला. भक्तिगीतांच्या सुरेल सादरीकरणामुळे परिसरात उत्साह आणि श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले. या भजनसेवेतून देवीच्या चरणी भक्तिभावाने सेवा अर्पण करण्याच्या धार्मिक परंपरेला उजाळा मिळाला.

या भजनसेवेत अहिल्यानगर येथील ज्ञानमाऊली भजनी मंडळाच्या सुनीता कोळी, सुनीता विद्यासागर, सुरेखा चेमटे, आशा काळे, सुषमा साळुंके, सुनंदा मुळे, अलका वडावकर, अनुराधा कराळे, लता भंडारी, पुष्पा ढाणके, शोभा ढेरे आणि सुचित्रा भालेराव यांनी सहभाग घेतला. तबलावादक महेश वाघमारे यांनी साथसंगत करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. मंडळाच्या सदस्यांनी सामूहिकरीत्या सादर केलेल्या भजनांमधून देवीभक्तीची भावना व्यक्त झाली.



ज्ञानमाऊली महिला भजनी मंडळ गेल्या आठ वर्षांपासून श्री वरखेड माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त सातत्याने भजनसेवा अर्पण करत आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या चरणी भक्तिगीतांच्या माध्यमातून सेवा करण्याची ही परंपरा मंडळाने जपली आहे. महिलांच्या सामूहिक सहभागातून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे धार्मिक श्रद्धेबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश दिला जात आहे.

भारतीय संस्कृतीत भजन, कीर्तन आणि भक्तिगीतांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या माध्यमातून भक्तिभाव जागृत होण्याबरोबरच समाजातील विविध घटकांना एकत्र येण्याची संधी मिळते. विशेषतः महिला भजनी मंडळे धार्मिक परंपरांचे जतन करून त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. ज्ञानमाऊली भजनी मंडळाची आठ वर्षांची अखंड सेवा हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

# शारदीय नवरात्रोत्सवात अमरापूर येथील रेणुकामातेच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

### स्व. चंद्रकांतदादा भालेराव यांच्या नवव्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन । देवीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच पंचक्रोशीतील भाविकांच्या रांगा

**शेवगाव । वीरभूमी –**

परिसरात यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतशिवारातील पिके पाण्याअभावी सुकली आहेत. त्यामुळे शेतकरी, कामगार, नोकरदार आणि व्यावसायिक अशा सर्वच घटकांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. मात्र, या प्रतिकूल परिस्थितीतही शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शेवगाव तालुक्यातील विविध देवी मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत आहे. नवरात्रोत्सवाच्या पाचव्या माळेला श्री क्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुका आईसाहेबांच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली.

तालुक्यातील भावीनिमगाव येथील जगदंबा देवी, बालमटाकळी येथील बालंबिका देवी, घोटण येथील कालिका देवी, लखमापुरी येथील महालक्ष्मी, पिंगेवाडी येथील पिंगला देवी, मुंगी येथील मुंगादेवी, तळणी येथील देवी तसेच श्री क्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुका आईसाहेबांच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. अनेक ठिकाणी भाविकांच्या उपस्थितीने गर्दीचा उच्चांक गाठला. पाथर्डी तालुक्यातील श्री मोहटादेवीच्या दर्शनासाठी जाणारे भाविकही श्रीक्षेत्र अमरापूर येथे आवर्जून थांबून रेणुका मातेचे दर्शन घेत आहेत.

दिवसभरात तारकेश्वर गडाचे महंत शांतिब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री, हनुमान टाकळीचे रमेशअप्पा महाराज, येळी संस्थानचे महंत रामगिरी महाराज, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, माजी जि. प. सदस्या आशाताई मुरकुटे, शिवाजीराव भुसारी, ज्ञानेश्वरचे संचालक बबनराव भुसारी, माजी उपसभापती अंबादास कळमकर, पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, शेवगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्षा माया मुंढे, शिवसेना नेते अरुण मुंढे, स्नेहलता लबडे, मुळा पाटबंधारे विभागाचे माजी कार्यकारी अभियंता बाळासाहेब लबडे, शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामदास गोल्हार, डॉ. रेणुका भालेराव, उद्योजक पंकज गांधी, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ तसेच नगर येथील स्वामी समर्थ महिला मंडळाच्या बेबीताई कराळे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून आईसाहेबांचे दर्शन घेतले.





यावेळी रेणुकाभक्तानुरागी डॉ. प्रशांत भालेराव यांनी पूज्य आदिनाथ महाराज शास्त्री आणि महंत रमेशअप्पा महाराज यांचे संतपूजन केले. पंचक्रोशीतील विविध शैक्षणिक संस्थांमधील बालचमूंच्या अनेक दिंड्या मंदिरात दाखल झाल्याने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला.

भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रेणुकाभक्तानुरागी मंगलताई भालेराव, जयंती भालेराव, मनीषा भालेराव, श्री रेणुकामाता मल्टीस्टेटचे प्रवर्तक व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव आणि ॲड. नितीन भालेराव यांनी विशेष लक्ष दिले आहे.

### स्व. चंद्रकांतदादा भालेराव यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानाचे निर्माते आणि रेणुकाभक्त स्व. चंद्रकांतदादा भालेराव यांच्या नवव्या पुण्यतिथीनिमित्त मंदिर परिसरात असलेल्या समाधीस्थळी अभिवादन करण्यात आले. यावेळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांचे प्रवचन झाले. अभिवादन करण्यासाठी नातेवाईक, भाविक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्त्रीशक्तीचा जागर ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी

## कविताताई आव्हाड । मैत्रेयी ग्रुपतर्फे 'जागर स्त्रीशक्तीचा, उत्सव नवरात्रीचा' कार्यक्रम

**● पाथर्डी । वीरभूमी-**

**आज महिलांनी सर्वच क्षेत्रांत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. समाजानेही परंपरावादी दृष्टिकोन झुगारून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला असला, तरी २१ व्या शतकातही पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा दिसून येतो. महिलांनी मानसिक गुलामगिरी झुगारून बौद्धिक प्रगल्भता जोपासणे गरजेचे आहे. स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व केवळ कागदावर न राहता प्रत्येक प्रक्रियेत महिलांचे मत जाणून घेणे आवश्यक आहे. महिलांनी विवेकनिष्ठ विचारसरणी स्वीकारल्यास स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व खऱ्या अर्थाने अमलात येईल. त्यामुळे नव्या पिढीत स्त्रीशक्तीचा जागर करणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मैत्रेयी ग्रुपच्या अध्यक्षा कविताताई आव्हाड यांनी केले.**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान, मैत्रेयी ग्रुप आणि बाबुजी आव्हाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जागर स्त्रीशक्तीचा, उत्सव नवरात्रीचा २०२६' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, प्रतीक्षा आव्हाड, डॉ. वैशाली आहेर, डॉ. आशा पालवे, प्रा. सुरेखा चेमटे, प्रा. माया पवार, प्रा. दिपाली पैठणकर, प्रा. कांचन म्हस्के आणि मेघा पोव्हरे उपस्थित होत्या.

कविताताई आव्हाड पुढे म्हणाल्या की, नवरात्र म्हणजे स्त्रीशक्तीची उपासना आणि महिलांमधील अद्भुत सामर्थ्याचा जागर. हा जागर केवळ नवरात्रोत्सवापुरता मर्यादित न राहता दररोज व्हायला हवा. त्यासाठी समाजाने महिलांचे मनोबल आणि आत्मबल वाढविणे गरजेचे आहे. महिलांना स्वतः च्या कायदेशीर हक्कांची आणि अधिकारांची माहिती करून देण्याबरोबरच त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

महिलांचे जीवन अधिक सुखकर होण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे. कोणाच्याही आधारावर अवलंबून न राहता त्यांनी आत्मविश्वासाने स्वतःच्या पायावर उभे राहावे. असे घडले, तरच खऱ्या अर्थाने स्त्रीशक्तीचा जागर होईल, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी मेहंदी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि समुपदेशन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थिनी आणि महिला शिक्षकांनी गरबा, दांडिया, फनी गेम्स, महिलांच्या असुरक्षिततेविषयी जनजागृती करणारे पथनाट्य, नृत्य तसेच राजस्थानी घूमर नृत्य अशा विविध उपक्रमांत उत्साहाने सहभाग घेतला.

सांस्कृतिक कार्यक्रमांमधून महिलांचे सामर्थ्य, आत्मविश्वास आणि सामाजिक जागरूकतेचा संदेश देण्यात आला. विविध उपक्रमांत सहभागी झालेल्या विद्यार्थिनींना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शलाका ढाकणे यांनी केले. प्रा. प्रणिता भावसार आणि सारिका लाडे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. लीना राठी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा

**● पारनेर । वीरभूमी-**

भारताचे माजी राष्ट्रपती आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.



आजच्या युगात मोबाईलच्या स्क्रीनमध्ये गुंतून राहण्यापेक्षा पुस्तकांच्या सहवासात रमण्याची सवय लावा. वाचन हे केवळ माहिती मिळविण्याचे साधन नसून स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती आणि विचारशक्ती विकसित करणारे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग आणि मराठी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. आहेर म्हणाले की, पुस्तकांच्या निरंतर वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाला वैचारिक समृद्धी लाभते. वाचनातून समाजात ज्ञान, सकारात्मकता, आत्मविश्वास आणि माणुसकीची मूल्ये रुजतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या दैनंदिन दिनक्रमातील किमान दोन तास अवांतर आणि मूल्यवर्धन करणाऱ्या वाचनासाठी आवर्जून द्यावेत.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शेकडो विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे 'सामूहिक वाचन प्रतिज्ञा' घेतली. वाचनसंस्कृती जोपासण्यासह दररोज वाचन करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केला.

महाविद्यालयाच्या केंद्रीय ग्रंथालयाच्या वतीने भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नामवंत साहित्यिकांची पुस्तके, दुर्मिळ ग्रंथ, स्पर्धा परीक्षांसाठीची मार्गदर्शक पुस्तके आणि प्रेरणादायी व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश होता. या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

'एक तास वाचनाचा' या विशेष उपक्रमांतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांनी ग्रंथालयात एकत्र बसून शांततेत विविध ग्रंथांचे वाचन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकांशी मैत्री करण्याची आणि वाचनाची गोडी जोपासण्याची प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शाखांचे विभागप्रमुख, ग्रंथपाल मिनाक्षी चक्रे, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल मिनाक्षी चक्रे यांनी केले. श्री. पोपट ठाणगे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. हरेश शेळके यांनी आभार मानले.

# कोल्हारमध्ये छत्रपती शिवरायांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचे सोमवारी अनावरण

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते लोकार्पण; डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**● राहता । वीरभूमी-**

कोल्हार - भगवतीपूर परिसरातील शिवप्रेमींची अनेक वर्षांची प्रतीक्षा आता संपणार आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचा अनावरण सोहळा सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण होणार असून, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्यानिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण असून, कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.



कोल्हार - भगवतीपूर परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी लक्षात घेऊन सुमारे दीड कोटी रुपये खर्चून छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. नगर-मनमाड महामार्गालगत कोल्हार बसस्थानकाच्या प्रांगणात उभारण्यात आलेला हा पुतळा परिसराच्या वैभवात भर घालणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नांतून हा प्रकल्प पूर्णत्वास आल्याचे सांगण्यात येत आहे.

अनावरण सोहळ्याच्या निमित्ताने प्रसिद्ध गायक अभिजीत जाधव यांचा 'शिवशंभो गर्जना' हा प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमातून शिवकालीन गीतांसह छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची, पराक्रमाची आणि स्वराज्याच्या इतिहासाची गाथा सादर केली जाणार आहे.

या सोहळ्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे कोल्हार-लोणी रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून कार्यक्रमस्थळापर्यंत काढण्यात येणारी भव्य मिरवणूक. फटाक्यांची आतषबाजी, मावळे आणि शिवकालीन सरदारांच्या वेशभूषेतील युवकांचे सादरीकरण तसेच जिवंत ऐतिहासिक देखावे यामुळे मिरवणुकीला विशेष रंगत येणार आहे.

अनावरण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर कोल्हार-भगवतीपूर परिसरातील प्रमुख रस्ते भगव्या पताकांनी सजविण्यात येत आहेत. ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येत असून, शिवप्रेमी युवक, ग्रामस्थ आणि विविध पदाधिकारी कार्यक्रमाच्या नियोजनात सहभागी झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणाचा हा सोहळा उत्साहात पार पडावा, यासाठी आयोजकांकडून प्रयत्न सुरू आहेत. या ऐतिहासिक सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोरडगाव ग्रामपंचायतीचा ठराव : पशुधनासाठी चारा डेपो सुरू करा!

## २ हजार ६८८ पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर, चारा डेपो अथवा अनुदान देण्याची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी-**

दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथील पशुधनासाठी चारा व पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. तसेच पशुपालकांना दिलासा देण्यासाठी चारा छावणीऐवजी चारा डेपो सुरू करावा किंवा चारा अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी कोरडगाव ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे केली आहे. गावातील पशुधनाची संख्या आणि पशुपालकांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हा ठराव मंजूर करण्यात आला.



ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार, कोरडगाव येथे सुमारे २ हजार ६८८ पशुधन असून, चारा व पाण्याच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनावरांचे संगोपन करताना शेतकरी व पशुपालकांवर आर्थिक भार पडत असून, पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे ठरावात नमूद करण्यात आले आहे.

गावातील पशुधनाची संख्या लक्षात घेता चारा छावणीऐवजी पर्यायी उपाय म्हणून चारा डेपो सुरू करावा किंवा पशुपालकांना चारा अनुदान द्यावे, अशी भूमिका ग्रामपंचायतीने मांडली आहे. चारा छावणी सुरू करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन संबंधित प्रशासनाने व्यवहार्य पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

या ठरावावर सरपंच साखरबाई म्हस्के, उपसरपंच प्रतिभा प्रतापराव देशमुख, ग्रामपंचायत अधिकारी शंकर दातीर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

या ठरावाची प्रत रविंद्र म्हस्के यांनी तहसील कार्यालयात नायब तहसीलदार रविंद्र शेकटकर यांच्याकडे सादर केली. शासनाने या मागणीवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामपंचायतीच्या सभेत मंजूर झालेल्या या ठरावातून पशुधनाचे संगोपन, पशुपालकांचे हित आणि जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध करून देण्याचा प्रश्न अधोरेखित करण्यात आला आहे. प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# पाथर्डीत रंगणार आंतरराष्ट्रीय कुस्त्यांचा थरार; लाखोंची बक्षिसे!

**● पाथर्डी । वीरभूमी-**

पाथर्डी शहरात कुस्तीप्रेमींसाठी आंतरराष्ट्रीय कुस्त्यांच्या भव्य मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे. वीर वडार समाज संघटनेच्या वतीने आयोजित या मैदानात नामांकित मल्लांच्या चित्तथरारक कुस्त्या रंगणार असून, विजेत्या पैलवानांना लाखो रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. त्यामुळे परिसरातील कुस्तीप्रेमींमध्ये या मैदानाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता या कुस्ती मैदानाला सुरुवात होणार आहे. पारंपरिक कुस्तीची परंपरा जपणे, मल्लविद्येला प्रोत्साहन देणे, नवोदित पैलवानांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि कुस्तीप्रेमींना दर्जेदार सामने पाहण्याची संधी मिळवून देणे, हा या आयोजनामागील उद्देश आहे.

या मैदानातील प्रथम क्रमांकाच्या कुस्तीसाठी ५ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. या लढतीत हिंद केसरी उदय उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड आणि उपमहाराष्ट्र केसरी माऊली ठोकळे यांच्यात सामना रंगणार आहे.

द्वितीय क्रमांकाच्या कुस्तीसाठी ४ लाख ५१ हजार रुपये, तृतीय क्रमांकाच्या कुस्तीसाठी ३ लाख ५१ हजार रुपये, तर चतुर्थ क्रमांकाच्या कुस्तीसाठी ३ लाख ११ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. या प्रमुख लढतींसह महाराष्ट्रातील विविध भागांतील नामांकित पैलवान आपले कुस्ती-कौशल्य पणाला लावणार आहेत.

प्रमुख लढतींबरोबरच इतर अनेक कुस्त्यांचेही आयोजन करण्यात आले आहे. विविध वजनगटांतील पैलवानांना आपली ताकद, चपळता, डावपेच आणि कुस्तीतील कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे मैदानातील विविध लढती कुस्तीप्रेमींसाठी आकर्षण ठरणार आहेत.

या कुस्ती मैदानाला वीर वडार समाज संघटनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि कुस्ती क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मैदानाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांनी नियोजन केले आहे.

पाथर्डी परिसरातील नागरिकांनी आणि कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पैलवानांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन माजी नगरसेवक तुकाराम पवार, मच्छिंद्र पवार, विजय गोरे, लहू पवार, रवींद्र ऊर्फ भोरू म्हस्के, सुभाष पवार, संजय माने, महेश पवार, अण्णा पवार, पिराजी पवार आणि कैलास पवार आदींनी केले आहे.

# कासार समाजातील प्रत्येक कार्यकर्ता आमदार झाल्याची माझी भावना

## आ. हेमंत रासने । अकोले येथील कासार समाजाच्या कालिका मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आरती व आ. रासने यांचा शहर कासार समाजाच्या वतीने सत्कार

**● अकोले । वीरभूमी-**

आमदार झाल्यानंतर अनेक वर्षांनंतर अकोले येथे येत असल्याचा मला अभिमान आहे. अकोलेत आल्यानंतर आपल्या गावात आल्याचा मनस्वी आनंद होत आहे. देशात आणि राज्यात फिरत असताना जन्मभूमीबद्दलचे प्रेम, आस्था आणि जिव्हाळा कायम आहे. मी आमदार असलो, तरी कासार समाजातील प्रत्येक कार्यकर्ता आमदार झाल्याची माझी भावना आहे. समाजाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी समाजाचा प्रतिनिधी म्हणून भविष्यात प्रयत्न करेन, अशी ग्वाही पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी दिली.

अकोले येथील कासार समाजाच्या कालिका मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त शुक्रवारी रात्री आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी अकोले शहर कासार समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

आमदार रासने म्हणाले की, राजकीय आणि सार्वजनिक जीवनात काम करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) व भाजपच्या कार्यकर्त्यांमुळे त्यांना प्रथम पुणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविण्याची संधीही मिळाली. पुढे भाजपकडून आमदारकीची उमेदवारी मिळाल्यानंतर कासार समाजातील अनेक बांधव पुण्यात येऊन प्रचारात सहभागी झाले.

आपल्या रूपाने अल्पसंख्याक समाजातील व्यक्तीला आमदार होण्याची संधी मिळाली असली, तरी समाजातील प्रत्येक व्यक्ती आमदार झाल्याप्रमाणे आपल्याला वाटते, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी आनंद डांगरा यांनी मनोगत व्यक्त करत आमदार हेमंत रासने यांच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत बाळासाहेब कोळपकर यांनी केले. अकोले ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सुभाष कोळपकर यांच्या हस्ते आमदार रासने यांचा सत्कार करण्यात आला. रामेश्वर रासने यांनी आभार मानले.

यावेळी पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य सागर वैद्य, रोटरी क्लब अकोलेचे संस्थापक अध्यक्ष अमोल वैद्य, विनायक रासने, दिनेश जुन्नरकर, संतोष रावअंदुरे, अनिलशेठ भांडेकर, रमाकांत कानडे, निलेश तळेगावकर, अकोलेतील व्यापारी सुनील कोळपकर, संजय कोळपकर, विनोद रासने, रामेश्वर रासने, दिनेश रासने, अनिल कोळपकर, मुकुंद जुन्नरकर, कैलास सासवडे, भारत रासने, प्रशांत रासने, राजेंद्र रासने, सुनील सासवडे, राहुल सासवडे, पराग कोळपकर, सतीश रावअंदुरे, प्रशांत कोळपकर आणि संतोष कोळपकर उपस्थित होते.

तसेच अकोले नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, भाजपचे मंडळ अध्यक्ष राहुल देशमुख, ज्येष्ठ नेते धनंजय संत, मच्छिंद्र मंडलिक आणि सचिन जोशी यांच्यासह कासार समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमानंतर आमदार हेमंत रासने यांनी सुनील कोळपकर यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी कोळपकर कुटुंबीयांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अकोले येथील डी. के. मोबाईल शॉपीचे संचालक दिनेश रासने यांच्या दुकानालाही त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी रासने कुटुंबीयांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर कौटुंबिक स्नेही पत्रकार अमोल वैद्य आणि भाजपच्या नगरसेविका शितल वैद्य यांच्या महालक्ष्मी कॉलनी येथील निवासस्थानी त्यांनी भेट दिली. वैद्य कुटुंबीयांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

या भेटीदरम्यान अकोले तालुक्याचे माजी आमदार व भाजपचे नेते वैभवराव पिचड यांच्याशी आमदार रासने यांचा संवाद झाला. यावेळी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, सेवानिवृत्त शिक्षक मधुकरराव बिबवे, सेवानिवृत्त प्राचार्य शिवाजीराव बिबवे, अनिल कोळपकर, रामेश्वर रासने, मुकुंद जुन्नरकर आणि जनार्दन नवले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.